दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २३२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२२ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# एसटी बसला खोपोली घाटात अपघात ; ११ जखमी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

**एकविरा येथून दर्शन घेवून मुंबई चेंबूर येथे परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवासी बसला भिषण अपघात झाला, त्यानंतर जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर अंडा पॉईंटजवळ एसटी बसला अपघात झाला. या अपघातात ११ जणांना दुखापत झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.**



याबाबत सविस्तर वृत्त असे की, एम.एच. २० बी.एल. १५८३ (MH 20-BL-1583) या राज्य परिवहन बसला जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर अंडा पॉईंटजवळ अपघात झाला. या बस अपघातात वनिता प्रभाकर म्हात्रे (वय – ५१ वर्षे) गृहीणी रा. प्रभुआळी पेण यांना ओठ व दोन्ही गुडघ्यावर मुकामार लागला. आत्माराम नथुराम (वय – ७७ वर्ष) रा. पिटकीली, पो. कुसुमले, ता. अलिबाग यांना छातीला मुकामार लागला. शलाका चंद्रशेखर पाटील (वय – ३५ वर्ष) गृहीणी रा. पेण हे किरकोळ जखमी झाले आहेत. प्रथा बाळकृष्ण पाटील (वय – ६० वर्षे) शेती रा. बलोली पेण यांच्या ओठाला किरकोळ जखम झाली आहे. दगडू हरि चोगले वय – ४५ वर्षे) शेती रा. अंजप, ता. कर्जत यांच्या कपाळावर जखम झाली आहे. रमाबाई रामचंद्र पाटिल ( वय – ५४) गृहीणी रा. डोलवी पेण यांच्या हनुवटीच्या आतील बाजूस जखम झाली आहे. जोमा जाखु पाटील (वय ८२ वर्ष) घेरंड शहापुर अलिबाग यांच्या नाकावर टाके लागले असून काही किरकोळ जखमा झाल्या आहेत. किरकोळ जखमा झाल्या आहेत. आनंत वसंत पाटिल (वय – ५८ वर्ष) बिगारी रा. डोलवी परचा पाडा वडखळ, ता. पेण यांना किरकोळ जखम झाली आहे. अनिता आनंत पाटिल ( वय – ५५ वर्ष) गृहीणी रा. डोलवी परचा पाडा वडखळ, ता. पेण यांना कपाळावर चार टाके लागले आहेत. वंदना दगडू चोंगले (वय ४० वर्षे) रा. अंजप, ता. कर्जत यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

जखमींवर खोपोली येथील डॉं. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक रूग्णालयात उपचार करण्यात आले. दरम्यान, बसमधील प्रवाशांना पुढील प्रवासासाठी एमएसआरटीसीचे कर्ज डेपो मॅनेजर शंकर यादव हे संपूर्ण व्यवस्था करून देण्यासाठी प्रयत्नशील राहिले. त्यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी त्यांचे कर्मचारी पुढे पाठविले होते. जखमींना अपघातग्रस्तांच्या मदतीसाठीसह महामार्गावरील विविध यंत्रणांनी मदत केली.

# शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द बोलणाऱ्यांची जीभ हासडली पाहिजे : खा.उदयनराजे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ज्या लोकांची लायकी नाही आणि ज्यांना अक्कल नाही ते शिवाजी महाराजांविरोधात अशी वक्तव्ये करतात. खरं तर अशी वक्तव्ये ऐकल्यानंतर मला खूप संताप येतो, जीभ हासडली पाहिजे यांची...., अशी उद्विग्न प्रतिक्रिया भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी दिली. अगोदर राजेशाही होती, लोकांना ती नको होती. लोकशाही आली, आता लोकशाहीतले राजे कसे वागतात, कसे बोलतात तुम्हीच पाहा... मी तर म्हणेन राजेशाही पुन्हा आली पाहिजे, असं उदयनराजे म्हणाले.

राज्यपाल कोश्यारी आणि भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी शिवाजीराजेंविरोधात केलेल्या वक्तव्याने महाराष्ट्रात संतापाची लाट आहे. काँग्रेस–राष्ट्रवादी–शिवसेनेचे कार्यकर्ते आज राज्यातल्या विविध शहरांत आंदोलन करुन कोश्यारी–त्रिवेदींचा निषेध व्यक्त करत आहेत. काल फडणवीसांनी राज्यपाल कोश्यारी आणि त्रिवेदींची पाठराखण करत ते तसे बोललेच नाहीत, असं म्हणत त्यांची कड घेतली. यानंतर संभाजीराजेंनी फडणवीसांवर आसूड ओढत पाठराखण कसली करता, माफी मागायला लावा, असं म्हटलं. संभाजीराजेंच्या आक्रमक पवित्र्यानंतर उदयनराजेंच्या भूमिकेकडे लक्ष लागलं होतं. उदयराजेंनीही रोखठोक भूमिका घेत राज्यपाल आणि त्रिवेदींची अक्कल काढली.

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज एकप्रकारे देवाचे अवतार होते. मुठभर मावळ्यांना साथीला घेऊन त्यांनी स्वराज्याची निर्मिती केली. महाराष्ट्राला देवासमान असणाऱ्या शिवरायांबद्दल हे असे बोलूच कसे शकतात. अशी सगळी



वक्तव्य ऐकल्यानंतर चीड येते, संताप येतो... यांनी लायकी आहे का शिवरायांवर बोलण्याची... यांची जीभ हासडली पाहिजे..., अशा शब्दात उदयनराजेंनी आपला संताप व्यक्त केला. नालासोपाऱ्यात ते पत्रकारांशी बोलत होते.

राज्यपाल कोश्यारींना महाराष्ट्रात ठेऊ नये. पंतप्रधान मोदी यांना वाटत असेल त्या राज्यात त्यांनी कोश्यारींना पाठवावं. पण त्यांना लगोलग महाराष्ट्राबाहेर काढावं तसेच भाजप प्रवक्ता सुधांशू त्रिवेदीला माफी मागायला लावावी. पाठराखण करणाऱ्या फडणवीसांनी त्यांनी माफी मागायला भाग पाडावं, अशी भूमिका संभाजीराजे यांनी घेतली. तसेच माझी भूमिका परखड असते. लपून छपून किंवा कुणाआडून मी बोलत नाही, असं सांगतानाच तो त्रिवेदी छत्रपतींविरोधात बोललाय म्हणजे बोललाय... चुकीच्या वक्तव्याची पाठराखण करु नका, असं म्हणत फडणवीसांनाही खडसावलं.

# बोर्लीमध्ये भटक्या कुत्र्यांची वाढती दहशत : १५ ते २० जणांना चावा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली येथील बोर्ली नाका ते जुना बाजार भागात एका पिसाळलेल्या कुत्र्याने आतापर्यंत पंधरा ते वीस जणांना चावा घेतला असून त्यातील काही जणांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे समजते.

तालुक्यासह अनेक ठिकाणी तसेच समुद्र किना–यावर गेल्या अनेक दिवसांपासून विशेष करून सकाळच्या वेळेत भटक्या कुत्र्यांची वाढती दहशत मागील पंधरवड्यात तीन जणांवर हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली होती. रस्त्यावरील भटके कुत्रे पर्यटक व नागरिकांची डोकेदुखी ठरत असून याकडे शासनाच्या संबंधित तसेच ग्रामपंचायत व नगरपरिषदेच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी .../२

# राज्यपाल व खा.सुधांशु त्रिवेदी यांच्या विरोधात शिवसेनेने खारघरमध्ये छेडले निषेध आंदोलन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अवमान कारक बेताल वक्तव्य करणार्या राज्यपाल भगत सिंह कोश्यारी व भाजपा खासदार सुधांशु त्रिवेदी यांच्या विरोधात शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली खारघर येथे शिवसेना विधानसभेच्या वतीने जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी संगितले की या अगोदर ही राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी अवमान कारक भाष्य केलेलं होते, परंतु वारंवार असे वक्तव्य ते करत असतात या वक्तव्यामुळे आम्हा शिवसैनिकांचे मन दुखावलेले आहे. त्यामुळे आज त्यांचा शिवसेना पनवेल .../२

# वावोशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच रात्री २५ दुकानाचे शटर फोडले

## चिल्लरसह रोकड घेऊन चोरट्यांचा पोबारा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड़ जिल्ह्यातील खालापूर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणाऱ्या वावोशी दूरक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात काल रात्री पावणे तीनच्या सुमारास अज्ञात चार चोरट्यांनी जवळपास २५ दुकानांचे शेटर उघडून दुकानातील चिल्लर सह हजारो रुपयांची रोकड,एक लॅपटॉप व एक मोटारसायकल घेऊन पोबारा केला आहे. चोरट्यांचा हा सर्व प्रताप सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले असले तरी पोलिसांना

या चोरांबाबत काहीच सुगावा लागत नसल्याने चोरट्यांच्या कारवाईची भिंती व्यापाऱ्यांसह स्थानिकांच्या मनात बसली आहे.मागील दोन वर्षांतील तीन ते चार चोरीच्या घटनांचा उलगडा अद्यापपर्यंत पोलीसांना न करता आल्याने लोकांच्या मनात चोरांबद्दल भिंतीचे वातावरण निर्माण झाल्याचे पहायला मिळत आहे.




काल रात्री सव्वा पावणेतीन च्या सुमारास अज्ञात चार चोरट्याने वावोशी परिसरातील वावोशी फाटा, होराळे,डोणवत या ठिकाणच्या जवळपास २५ दुकानाचे शेटर उघडून दुकानातील चिल्लर,रोख रक्कम,सामान यावर डल्ला मारला असून काही दुकानांचे नुकसानही केले आहे ही बाब पहाटेच्या वेळी भाजी व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी याबाबतची माहिती स्थानिकांना दिली.स्थानिकांनी मग ही माहिती वावोशी दूरक्षेत्रातील .../२

# डेटिंग अॅपद्वारे एका अभियंत्याची झाली १ कोटी ६० लाखाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डेटिंग ॲपद्वारे एका अनोळखी महिलेसोबत मैत्री करणे खारघरमध्ये राहणाऱ्या एका स्वॉफ्टवेअर इंजिनीयरला चांगलेच महागात पडले आहे. या स्वॉफ्टवेअर इंजिनीयरने ज्या महिलेसोबत मैत्री त्या महिलेने त्याला क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्याच्या जवळची तब्बल १ कोटी ६० लाख रुपये उकळून त्याची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात महिलेविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेला स्वॉफ्टवेअर इंजिनीयर खारघरमध्ये कुटुंबासह राहण्यास असून, तो मुंबईत विक्रोळी येथील एका इन्शुरन्स कंपनीत स्वॉफ्टवेअर इंजिनीयर म्हणून कामाला आहे. गत जानेवारी महिन्यामध्ये या इंजिनीयरने आपल्या मोबाईलमध्ये ओके कपिड नावाचे डेटिंग ॲप डाऊनलोड केले होते. त्यानंतर काही दिवसांतच फिलिपिन्स या देशातील रहिवाशी असल्याचे भासवून रोज चेन नावाने एका महिलेने सदर डेटिंग ॲपच्या माध्यमातून या इंजिनीयरसोबत चॅटिंगद्वारे ओळख निर्माण केली होती. या महिलेने क्रिप्टो करन्सी एक्स्चेंजच्या बिनान्स कंपनीमध्ये अकाऊंट उघडण्यास सांगितल्यानंतर या इंजिनीयरने आपल्या नावाने अकाऊंट .../२

# माजी सभागृनेते परेश ठाकूर यांनी केली विविध विकासकामांची पाहणी

## नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेत त्यांच्याशी साधला संवाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रातील सुरु असलेल्या तसेच येणाऱ्या काळात होणाऱ्या कामांची पाहणी पनवेल महापलिकेचे माजी सभागृनेते परेश ठाकूर यांनी आज (दि. २१) केली. या पाहणी दरम्यान त्यांनी नागरीकांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधला. तसेच या वेळी कामांसंदर्भात महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

पनवेल महापलिका क्षेत्रात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक नागरीकामे मार्गी लागली आहेत. त्या पार्श्वभूमीवर महापालिका हद्दीतील देविचापाडा, ढोंगऱ्याचा पाडा, पेंधर, रोडपाली या गावातील रस्ते, गटारे, समाज मंदिराच्या कामांची तसेच स्मशानभुमीची माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पाहणी केली तसेच ओवेगावात पाणी तुंबण्याचा समस्येवर नागरीकांशी संवाद साधत समस्या जाणून घेतली. या वेळी त्यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना त्यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, अमर पाटील, संतोष भोईर, भाजपचे कंळबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, पडघे ग्रामपंचायतीचे .../२

# राज्यपाल भगतसिंग कोश्यारी व सुधांशू त्रिवेदी यांनी कर्जतमध्ये जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी व भाजपा प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल, कर्जत तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस व कर्जत तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला.

आज दि.२१ नोव्हेंबर रोजी कर्जत चार फाटा येथे जाहीर निषेध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या प्रसंगी कर्जत तालुका राष्ट्रवादी चे जेष्ठ नेत्ते तानाजी चव्हाण,कर्जत तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष सागर शेळके, कर्जत शहर कार्याध्यक्ष राजेश लाड, जगदीश ठाकरे, नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, भूषण पेमारे, नोमान नजे, वीरेंद्र जाधव, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना तालुका अध्यक्ष

आर्केश काळोखे, राष्ट्रवादी युवक ओ.बी.सी. सेल–कर्जत अध्यक्ष राजू हजारे, राष्ट्रवादी युवक शहर अध्यक्ष सोमनाथ पालकर, राष्ट्रवादी युवक माथेरान शहर अध्यक्ष सागर जोशी, शाहनवाज पानसरे, अरुण ऐणकर, ऋषी दाभाडे, जय बोराडे, तेजस भासे, रुपेश कोंडे, अप्पूराज गायकवाड, प्रवीण ठाकरे,चेतन ठाणगे, ऋषी राणे, अतुल कडू, तुषार देशमुख, .../२



# नांदगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी नसल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला आरोग्य केंद्राचा दर्जा मिळण्याची मागणी होत असताना मागील महिन्यापासून याठिकाणी वैद्यकीय अधिकारी नसल्याने पंचक्रोशीतील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत असून शासनाच्या संबंधित वरीष्ठ अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष घालून तातडीने प्रश्न मार्गी लावावेत.अशी भावना व्यक्त केली जात आहे.

नांदगाव येथील आरोग्य सेवेत असलेल्या प्राथमिक आरोग्य पथकाला प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा मिळावा.यासाठी भारतीय जनता पार्टीतर्फे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर व उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी यांना मागील महिन्यात एक निवेदन सादर करण्यात येऊन मागणी करण्यात आली होती.


याबाबत तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात प्राथमिक आरोग्य पथक नांदगांव हे पंचक्रोशीतील एकमेव आरोग्य पथक असून सध्या हे विविध समस्यांचे आजार बनले आहे. या पथकामध्ये आजूबाजूच्या गाव–ातील रुग्ण आरोग्य सेवेचा लाभ घेण्यासाठी येत असून सध्या त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. .../२

# साहित्यसंपदा अरुणोदय ऑनलाईन वाचनकट्टा येथे कातळातील पाझर काव्यसंग्रह लेखक कवी संजय महिपती पाटील ह्यांचे विशेष मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठी भाषा संवर्धन , वाचनसंस्कृतीस चालना ,नवं नवीन विचार पुस्तकांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचावेत, कवी लेखक आणि वाचक ह्याच्या परस्पर संवादातून कवितेची किंवा कथेची वाचकांना अधिक ओळख व्हावी. एखाद्या पुस्तकावर चर्चा होऊन भावी पिढयांना वाचनाची गोडी लागावी या व अनेक हेतूंनी साहित्यसंपदातर्फे अरुणोदय ऑनलाईन वाचन कट्ट्याची स्थापना वाचन प्रेरणादिनी करण्यात आली आहे.

ह्या महिन्यातील ऑनलाईन वाचन कट्ट्याच्या माध्यमातून कवी लेखक संजय महिपती पाटील लिखित कातळातील पाझर ह्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहातील निवडक कवितांचे वाचन पार पडले. उपस्थितांना प्रत्यक्ष कवीशी संवाद साधता आला .संजय पाटील ह्यांनी काही निवडककवितांची पार्श्वभूमी सांगताना खाकी वर्दीतील कवी मन अलगद श्रोत्यांसमोर उलगडले. वैभव धनावडे ,प्रांजली मोहिते ह्यांनी सदर पुस्तकातील कविता सादर केल्या.जेष्ठ गझलकार ए के शेख सरांची गझल स्मिता हर्डीकर ह्यांनी सादर करून वाहवा मिळवली.वाचन कट्टा ऑनलाईन असल्याने महाराष्ट्रातील विविध भागातील लोकांनी सहभाग घेतला वसईहुन विजय पराडकर ,नाशिक येथील योगिनी पैठणकर ,पुणे येथील हेमा जाधव ह्यांनी सुद्धा आपल्या कविता सादर केल्या.



विशेष बाब म्हणजे वाचन कट्ट्याच्या माध्यमातून संस्कारसंपदा मधील लहान वयोगटातील मुलांनीही सहभाग नोंदवला. साहित्यसंपदा प्रकाशनतर्फे प्रकाशित ,जया पाटील लिखित आणि कमी काळात शेकडो मुलांच्या पसंदीस उतरलेल्या चिमुकले जगत बालकाव्यसंग्रहातील कविता स्वरा कडू हिने वाचून ,आपली स्वलिखित कविता सुद्धा सादर केली. पुण्याहून कर्तव्या गावंडे हिने स्वअनुवादित कथा सादर करून आपल्या बुद्धीची चुणूक दाखवली.युक्ता राठोड ,नम्रता चव्हाण ,विद्या पराडकर ह्या बालकांनी कविता सादर करून मराठीची धुरा आम्ही बालके सांभाळू असा संदेश सुद्धा दिला .गोंदिया येथून मिहान रहांगडाले,महाराष्ट्राच्या अंतिम कोपरा समजला जाणारा भाग गोंदिया येथून पार्थ रहांगडाले ह्यांचा वाचन कट्ट्यावरील सहभाग कौतुकास्पद ठरला.सर्व मुलांना वाचन कट्ट्याच्या निमित्ताने कातळातील पाझर काव्यसंग्रहाचे कवी संजय पाटील ह्यांच्याशी संवाद साधता आला.

संजय पाटील ह्यांनी मुलांना मार्गदर्शन करताना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी गुगल मिटच्या माध्यमातून वाचन कट्टा पार पडणार असून विविध स्तरांतील आणि भागांतील लोकांनी,मुलांनी सहभाग नोंदवून सृजन समाज निर्मितीस हातभार लावावा असे आवाहन करण्यात आले.

# पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स क्र.०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorportation.com

जा.क्र./प.महा/पर्या./२८२२/प्र.क्र.३६/१७९/२०२२ दि.२१/११/२०२२

**निविदा सुचना क्र.२ (द्वितीय वेळ) (2nd call)**

पनवेल शहराच्या आजूबाजूच्या औद्योगिक क्षेत्राचे पर्यावरण सर्वेक्षण करणेबाबत. इच्छुकांनी सदरची निविदा दि.३०/११/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडे सादर करावीत. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | अंदाज पत्रकीय रक्कम | काम पूर्णत्वाचा कालावधी | अनामत रक्कम | निविदा प्रपत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल शहराच्या आजूबाजूच्या औद्योगिक क्षेत्राचे पर्यावरण सर्वेक्षण करणेबाबत. | ८,००,०००/- | कार्यादेश दिल्यापासून ३० दिवसांचा असेल | रु.८,०००/- | रु.५९०/- (GST सह) |

या कामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्र.०१ मध्ये सादर करण्याचा आहे.
२) याकामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि.३०/११/२०२२ दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत पर्यावरण विभागात उपलब्ध होतील.
३) जाहीर निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.
४) नमूद केलेले दर हे सर्व प्रकारचे कर व वाहतूक खर्चासह समाविष्ट असावेत.

**सही/-**
**(डॉ.प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

# माणगांव क्रिडा संकुलात प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

श्रीराम शस्त्रकला प्रशिक्षण संस्थेचे संचालक रायगड जिल्हा-तील नामांकित शस्त्रकला प्रशिक्षक चौल रेवदंडा येथिल शिरश नाईक सर यांच्या नेतृत्वाखाली आणि सह्याद्री स्पोर्ट्स वेलफेअर असोसिएशन माणगांव यांच्या माध्यमातून परंपरागत चालत आलेली शस्त्रकला जिवंत ठेवावी, तसेच शालेय क्रिडा स्पर्धांच्या माध्यमातून मल्लखांब, लाठी-काठी अशा क्रिडा प्रकारातून आपले व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी आज रविवार दि.२० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ०६ .५० वाजता माणगांव तालुका क्रीडा संकुल मैदान खर्डी येथे या प्रशिक्षण वर्गाचा रायगड भूषण जेष्ठ पत्रकार रविंद्र कुवेसकर यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी सह्याद्री स्पोर्ट्स वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष-समीर महामुनकर, सचिव-सखाराम कदम, कार्याध्यक्ष-महेंद्र गजमल, उपाध्यक्ष-स्वप्नील नागे, सहसचिव-विद्याधर उतेकर, कोष्याध्यक्ष-सुशील म्हामुनकर, सहकोषाध्यक्ष-तुकाराम चव्हाण, सदस्य- राजेंद्र खाडे, मंदार चवरकर. तसेच २७ लहान मुल-मुली प्रशिक्षणार्थी व मोठ्या संख्येने पालकवर्ग उपस्थित होते. अलिकडे अभ्यासाचे ओझे मोबाईलवर ऑनलाइन शिक्षणात गुंतलेल्या लहान मुलांनी शिबीर प्रशिक्षणाचे पहिल्याच दिवशी मोठ्या जोशात लाठीकाठी फिरविण्याचे धडे गिरविताना मैदानी साहसी खेळाचा मनसोक्त मोकळा आनंद घेतला.

**शुद्धीपत्रक**

दि. १८/११/२०२२ रोजी दैनिक रायगड नगरी या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या म्हसळा नगरपंचायतकडील जाहीर नोटीस सूचना मधील अनुक्रमांक ३ व ११ खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २ | ६८४ पैकी | श्रीवर्धन गोरेगाव रोड | कमर्शियल मुंगये कॉम्प्लेक्स आर. सी. सी. पद्धतीत निवासी इमारत तळ मजला गाळा नं. ४ व गाळा नं. ७ (G+२) बिल्टप क्षेत्र | खालीद इनायतुल्ला मुंगये | खलील अ.शकूर गणतारे |
| ११ | ३ | १४६२ | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेले घर डब्बल | महमद इकबाल महमद हुसैन रोघे | दिलशाद बेगम म. इकबाल रोघे<br>अब्दुल कुद्रुस म. इकबाल रोघे<br>शादाब म. इकबाल रोघे<br>सहिम म. इकबाल रोघे<br>यास्मीन आब्दुला रजानी |

जा क्र.२१३५ म्हनप /२०२२-२३
म्हसळा नगरपंचायत कार्यालय,म्हसळा,
जि. - रायगड, दिनांक :- २१/११/२०२२

सही/-
मुख्याधिकारी
म्हसळा नगर पंचायत

सही/-
नगराध्यक्ष
म्हसळानगरपंचायत

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बोर्लीमध्ये भटक्या कुत्र्यांची वाढती दहशत : १५ ते २० जणांना चावा

व्यक्त होत असून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून मुरुड तालुका तसेच समुद्र किनारी सकाळच्या वेळेत भटके कुत्रे टोळक्याने फिरताना दिसतात.त्यामुळे सकाळच्या वेळेत समुद्र किनारी फिरायला (मॉर्निंग वॉकला)जाणा-या नागरिकांची व पर्यटकांची डोकेदुखी ठरत आहे.यापुर्वी देखील मुरुड मध्ये श्वानदंशाच्या अनेक घटना घडल्या आहेत.नुकत्याच नांदगाव मध्ये तीन जणांना तर मुरुड मध्ये देखील तीन जणांना श्वानदंश झाल्याच्या घटना ताज्या असतानाच बोर्ली मध्ये पिसाळलेल्या कुत्र्याने आतापर्यंत पंधरा ते वीस जणांना चावा घेतला आहे. समुद्रकिनारी भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली असून अजूनही वेळप्रसंगी कोणत्याही क्षणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.यासाठी प्राणी मित्र संघटना , विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन तसेच शासनाच्या आरोग्य खात्याने व संबंधित नगरपरिषद व ग्रामपंचायत यांनी यात लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी ग्रामस्थ व नागरिकांतून जोर धरीत आहे.

## शिवसेनेने खारघरमध्ये छेडले निषेध आंदोलन

विधानसभेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. या आंदोलनास शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, तालुका प्रमुख संदीप तांडेल, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर संघटक शशिकांत डोंगरे, उपमहानगर प्रमुख रामदास गोंधळी, प्रकाश गायकवाड, आत्माराम गावंड, शहर प्रमुख गुरूनाथ पाटील, यतीन देशमुख, सदानंद शिर्के, युवासेनेसेचे उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, महिला आघाडीच्या विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, तालुका संघटिका सौ. अनीता डांगरकर, उपमहानगर संघटिका सौ. रीना पाटील, शहर संघटिका सौ. संगीता राऊत, सौ. सानिका मोरे यांच्या सह उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, शाखा प्रमुख आदि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वावोशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच रात्री २५ दुकानाचे शटर फोडले

पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांची झोप उडाली. एकाच रात्री आणि एकाच ठिकाणी जवळपास २५ दुकानांचे शेटर उघडून चोरी झाल्याची घटना समजतात खालापूरचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार हे आपल्या ताफ्यासह वावोशी पोलीस ठाण्यात दाखल झाले.मग त्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मार्फत चोरट्यांचा तपास करणे सुरुवात केली मात्र बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे हे रात्रीच्या अंधारात चोरट्यांचे चित्र व्यवस्थित टिपण्यात असमर्थ असल्याने पोलिसांना चोरट्यांचा काहीच तपास लागलेला नाही. मात्र या चोरीच्या प्रकरणात चार अज्ञात चोरटे असल्याचे काही सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेज मध्ये दिसून येत आहेत. मात्र पोलीस त्यांना ओळखतील असे त्यांचे चेहरे दिसत नसल्याने हे चोरटे पोलिसांच्या हाती लागतील याबाबत शंकाच व्यक्त केली जात आहे. या परिसरात मागील दोन वर्षात अशाच प्रकारे चोरीच्या घटना अनेक वेळा घडल्या आहेत. अद्याप पर्यंत एकही चोरीची घटना पोलीस उघड करण्यात यशस्वी ठरले नसल्याने लोकांच्या मनात तसेच व्यापारी वर्गाच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## डेटिंग ॲपद्वारे एका अभियंत्याची झाली १ कोटी ६० लाखाची फसवणूक

उघडले होते. त्यानंतर इंजिनीयरने या ॲपमधून १६,११० रुपये यूएसडीटीमध्य एक्स्चेंज केले असता, त्याचे १९९ यूएसडीटी झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले. त्यानंतर तिच्या सांगण्यावरून या इंजिनीयरने क्रिप्टो करन्सी एक्स्चेंज करण्यासाठी आपल्या तिन्ही बँकेत असलेली तब्बल १ कोटी ६० लाख रुपयांची बिनान्स ॲपमध्ये गुंतवणूक केली. त्यानंतर या इंजिनीयरला २, ७२,५९२ यूएसडीटी (सव्वा दोन कोटी रुपये) नफा झाल्याचे ॲपमध्ये दाखवण्यात आले. मात्र, त्याने ही रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता, त्याला सदर ॲपमधून पैसे काढण्यासाठी विविध कारणे सांगण्यात येऊ लागली. तसेच त्याला आणखी रक्कम भरण्यास सांगण्यात येऊ लागली. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्याने त्याने याबाबतची तक्रार केली आहे.

## माजी सभागृनेते परेश ठाकूर यांनी केली विविध विकासकामांची पाहणी

माजी सरपंच कृष्णा पाटील, भाजप युवामोर्चाचे जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, खारघर तळोजा मंडळ अध्यक्ष विनोद घरत, भाजपनेते अशोक साळुंखे, विजय म्हात्रे, महेंद्र म्हात्रे, सुरज फडके, हरीशेठ फडके, ज्ञानेश्वर डोंगरे, लहूशेठ डोंगरे, सुरेश डोंगरे, नितीन पाटील भगवान कोपरकर, महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर यांच्यासह पदधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

## राज्यपाल भगतसिंग कोश्यारी व सुधांशू त्रिवेदी यांनी कर्जतमध्ये जाहीर निषेध

महेंद्र ठोंबरे, विशाल भवारे, किशोर सावंत, भाऊ लदगे, योगेश कांबरी, संभाजी लदगे, ज्ञानेश्वर लदगे, विलास लदगे, किरण बडेकर, योगेश थोरवे, सालिक तांबोळी, तुषार देशमुख, अक्षय जाधव, श्याम पाटील,आकाश शेळके ,सुदेश हजारे योगेश गंगावणे,अक्षय भोईर, सुशांत बोराडे, समीर मसणे,रोहन चव्हाण,जितू करताडे, काका ढाकवळ, सुरज शेळके आदी राष्ट्रवादी युवक व विध्यार्थी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते. याप्रसंगी ज्येष्ठ नेते तानाजी चव्हाण, राजेश लाड व युवक अध्यक्ष सागर शेळके यांनी आपले मनोगत व्यक्त करून जाहीर निषेध व्यक्त केला.

## वैद्यकीय अधिकारी नसल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

येथे निवासी वैद्यकीय अधिकारी यांची कमतरता असल्याने रात्री अपरात्री नांदगाव मजगांव पंचक्रोशीतील रुग्णांना मुरुड अलिबाग जावे लागत आहे. तसेच याठिकाणी वैद्यकीय अधिकारी (चइइड) डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्ण सेवेमध्ये वारंवार अडचणी निर्माण होत आहेत, कोविड - १९ या महामारीतून ही आपण घडा घेतला नसल्याचे या समस्यामुळे पुन्हा अधोरेखित होत आहे. गर्भवती स्त्रियांना देखील वेळेवर उपचार उपलब्ध होत नसल्याने त्यांना पुढील उपचारास अलिबाग- मुंबई येथे जावे लागत आहे.

नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य पथकाचे रूपांतर प्राथमिक आरोग्य केंद्रात करून वैद्यकिय सेवांची उपलब्धता करून द्यावी. जेणेकरून येथील गोरगरीब जनतेस प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा उपलब्ध होईल. असे भारतीय जनता पार्टीतर्फे गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले होते मात्र वेळोवेळी निवेदने देऊन मागणी करण्यात येऊनही अद्याप या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी नसल्याने पंचक्रोशीतील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून याविरोधात वेळप्रसंगी जन आंदोलन केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.शासनाच्या संबंधित अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष घालून येथील आरोग्य उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून जनतेचा दुवा घ्यावा.अशी भावना व्यक्त होत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मेसर्स श्री.गणेश असोसिएट्स तर्फे भागीदार १) श्री.अनिल चंद्रकांत म्हात्रे, २) श्री.गंगाराम विठ्ठल सापते यांचा कार्यालयीन पत्ता : शॉप नं.०३, शांती सागर अपाटमेंट, प्लॉट नं.५३, सेक्टर ११, युनियन बँक ऑफ इंडिया, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९ यांना सिडको लि. यांनी लागू केलेल्या गावठाण विस्तार योजनेंतर्गत भूखंडाचे हस्तांतरण करण्यात आले असून त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**हस्तांतरण झालेल्या भूखंडाचे वर्णन**

| गांव | भूखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| करंजाडे | १ अ | १ | २९९.६३ |

वरील भूखंडावर मेसर्स श्री.गणेश असोसिएट्स यांनी वक्रतुंड रेसिडेन्सी या इमारतीचे बांधकाम पूर्ण केले असून, त्या इमारतीमधील सर्व निवासी सदनिका व गाळे यांची विक्री माझ्या अशिलांचे नावे म्हणजेच मे.वक्रतुंड रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चे सभासद यांच्या नावे करण्यात आलेली आहे.

सदरहू भखंड हा माझ्या अशिलांचे नावे हस्तांतरीत करणे वरील इसमांवर बंधनकारक असून व यापूर्वी निष्पादीत केलेल्या निवासी सदनिका व गाळे यांच्या विक्री करारांची पुर्तता वरील इसमांनी करून देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तसेच सदरहू भूखंड हस्तांतरीत करण्यापूर्वी तो निर्वेध, बिनकर्जी, बोजारहीत व निजोखकी असणे आवश्यक आहे. जर सदरहू भूखंडावर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध विक्री, बक्षिसपत्र, कुलमुखत्यारपत्र, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी ताबा-कब्जा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, वा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्यावर पुराव्यासह लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू भूखंडाच्या हस्तांतरणाची प्रक्रिया माझ्या अशिलांच्या नावे पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी, कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २१/११/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रविण लक्ष्मण पाटील**
**१०२, मंगलकलश को.ऑप.हौ. सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९९२०८३५२८७**

मे.इंदलकर सो
ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.१२५९/२०२२
ने.ता.२९/१२/२०२२

मोहम्मद इस्माईल महमुदमिया पटेल
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.२१६/१, ग्रामपंचायत जवळ, तळोजा पाचनंद,
तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी पै.जैतुन महमुदमिया पटेल यांचा मृत्यू दि.२०/११/१९६८ रोजी तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर पै.जैतुन महमुदमिया पटेल यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर पै.जैतुन महमुदमिया पटेल ह्या वर नमूद ठिकाणी मयत झाल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा धेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२१/११/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया., पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया., पनवेल**

### जाहीर नोटीस

सर्वांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, निम्ननिर्दिष्ट मालमत्ता जमीन मालकांनी त्यांचे मालकी वहिवाटीची व निर्वेध आहे असा निर्वाळा दिला. मिळकतीचे सर्व हक्क अधिकारसुद्धा मिळकत कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे अशिलाजवळ बोलणी चालू आहेत. तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सदर मिळकतीसंदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणेचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्यूपत्र इ. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अन्यथा सदर नोटीस मुदत अखेर कथित हक्क अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरील प्रमाणे नोटीस प्रसिद्ध करणेंस येत आहे.

**अ) मिळकतीचे वर्णन :- मौजे : गोवेले कोंड, ता.माणगांव, जि.रायगड येथील मिळकत, तिचे वर्णन खालीलप्रमाणे,**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ९५ | ०-७०-६०<br>पो.ख. ०-१३-००<br>०-८३-६० | १.२९ | १) दगडू बाळोजी धाडवे<br>२) वसंत बाळोजी धाडवे<br>३) अनिता लक्ष्मण बाईत |

माणगांव,
दि.२१/११/२०२२

**सही/-**
**ॲड.राहूल प्र. ओक**
**'मानस', मुंबई-गोवा हायवे, पो.ता.माणगांव, जि.रायगड**
**मो.नं.८८८८३७३००५**
**(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)**

### जाहीर नोटीस

सर्वांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, निम्ननिर्दिष्ट मालमत्ता जमीन मालकांनी त्यांचे मालकी वहिवाटीची व निर्वेध आहे असा निर्वाळा दिला. मिळकतीचे सर्व हक्क अधिकारसुद्धा मिळकत कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे अशिलाजवळ बोलणी चालू आहेत. तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सदर मिळकतीसंदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणेचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्यूपत्र इ. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अन्यथा सदर नोटीस मुदत अखेर कथित हक्क अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरील प्रमाणे नोटीस प्रसिद्ध करणेंस येत आहे.

**अ) मिळकतीचे वर्णन :- मौजे : चाच, ता.माणगांव, जि.रायगड येथील मिळकत, तिचे वर्णन खालीलप्रमाणे,**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८६ | २७-६०-००<br>पो.ख.२७-६०-००<br>५५-२०-००<br>पैकी ६०० गुंठे | ६.०० | दिपक मेघाजी सावळा |

माणगांव,
दि.२१/११/२०२२

**सही/-**
**ॲड.राहूल प्र. ओक**
**'मानस', मुंबई-गोवा हायवे, पो.ता.माणगांव, जि.रायगड**
**मो.नं.८८८८३७३००५**
**(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शिवाजी शिंदेंच्या प्रयत्नांमुळे मिनिबसच्या वेळापत्रकात बदल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील नियमितपणे कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मिनिबसच्या वेळापत्रकाप्रमाणे कॉलेजला वेळेत पोहोचणे शक्य होत नव्हते त्यासाठी सकाळच्या वेळेत ०६-३० वाजता ही बस सेवा सुरू करावी असे काँग्रेसचे माजी नगरसेवक (विरोधी पक्षनेते ) शिवाजी शिंदेंनी कर्जत डेपो आगार प्रमुख शंकर यादव यांच्याशी दि.९ नोव्हेंबर रोजी लेखी निवेदनाद्वारे पत्रव्यवहार केला होता. त्यावेळी यादव यांच्या कडून सांगण्यात आले होते की माथेरानच्या मुख्याधिकारी यांचे पत्र सादर करावे त्याप्रमाणे शिवाजी शिंदे आणि काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी विद्यमान मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांना आपल्या कार्यकर्त्यांसह तसेच महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन निवेदन सादर केले होते त्याप्रमाणे मुख्याधिकारी यांनीही आगार प्रमुख यादव यांना या महत्त्वाच्या विषयावर पत्र सादर केले होते.त्यानुसार दि.२१ नोव्हेंबर पासून या बसच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला असून विद्यार्थ्यांना त्याचप्रमाणे नियमितपणे प्रवास करणाऱ्या व्यापारी वर्गासह नागरिकांना दिलासा मिळाला आहे. मिनीबसचे नवीन वेळापत्रक कर्जत ते माथेरान सकाळी ५-१५, सकाळी ८-१५, दुपारी १२-०५, दुपारी १४-३०, संध्याकाळी १७-०० वाजता माथेरान ते कर्जत सकाळी ६-३०, सकाळी ९-२०, दुपारी १३-२०, दुपारी १५-४५, संध्याकाळी १८-१० वाजता




### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : पनवेल महानगरपालिका हद्दीमधील खाली नमूद केलेली मिळकत श्री.परेश शिवजी राठी यांचे नावे महानगरपालिका दप्तरी मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील फायनल प्लॉट नंबर १०१/३, एकूण क्षेत्र ३१९ चौ.मी., यावरील इमारत ''ओम साई'', शॉप नंबर ०२, तळमजला, एकूण क्षेत्र १५३ चौरस फुट, १४.२२ चौरस मीटर

वरील नमूद मिळकती आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या मिळकतींमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचे मालक यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२२/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.मयुरेश प्र. हनुमंते**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**



मा.खिरापते साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.अनिल एस. जाधव

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२१८/२०२२
नि.नं.९/ड
ने.ता.०३/०१/२०२३

१) श्री.अब्दुल हन्नान अब्दुल मजीद कर्ते
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.अब्दुल लतीफ अब्दुल मजीद कर्ते
वय : ४४ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्रं.१ व २ तर्फे अखत्यारी
सौ.फातीमा एस. गोंडेकर
वय : ५५ वर्षे, धंदा : घरकाम
रा.उरण, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, पै.आईशा अब्दुल मजीद कर्ते ही उरण येथे दि.१४/०४/२०२० रोजी मयत झालेली आहे. तीच्या सामाईक मालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथील वडिलोपार्जित सिडकोने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|
| २९६ | १/ए | ०२-४२-०० | १९ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मयत पै.आईशा अब्दुल मजीद कर्ते त्यांच्या सामाईक मालकीची होती व आहे यांच्या संपादीत मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता सिडको महामंडळाकडून नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झालेल्या मिळकतीचे १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड प्राप्त करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने योग्य व उचित असल्याने अर्जदार यांनी मयताचा वरसदाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर उरण यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील संपादीत मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलांमार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे. व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज माहे २१ नोव्हेंबर सन २०२२ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**


# पनवेल महानगरपालिकेच्यावतीने गोवर प्रतिबंधात्मक उपाय योजनेस सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**



आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या आदेशानूसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, एएनएम, जीएनएम, आशा वर्कर यांची आज आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात वैद्यकिय आरोग्य विभागाच्या प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकित जागतिक आरोग्य संघटनचे विशेष समन्वयक डॉ. अरुण काटकर यांनी उपस्थितांना 'गोवरवरील प्रतिबंधात्मक उपाय योजना यावरती मार्गदर्शन केले.

मुंबई तसेच रायगड जिल्हयामध्ये गोवर रूबेला संसर्गजन्य आजाराचे रुग्ण आढळत असून या आजाराचा मुंबईत होत असलेला उद्रेक या पार्श्वभूमीवर गोवर रूबेला निर्मूलनासाठी करावयाची उपाययोजना यावरती या बैठकित चर्चा करण्यात आली. गोवरवरती लसीकरण हा प्रभावी उपचार असून त्यादृष्टीने लसीकरणाचा वेग वाढविणे ,लसीकरण बाकी राहिलेल्या बालकांसाठी अभियान स्वरूपात विशेष लसीकरण सत्रे राबविण्यात यावी अशा सूचना यावेळी सर्व वैद्यकिय आरोग्य अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

सर्वेक्षणा दरम्यान गोवर रूबेला आजाराची लक्षणे असलेल्या रूग्णास विटॅमिन 'ए' चा पहिला डोस वयाप्रमाणे देण्यात यावा तसेच दुसरा डोस २४ तासानंतर देण्यात यावा अशा सूचना देण्यात आल्या.

गोवरचे संशयित शोधण्यासाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय घरोघरी सर्वेक्षण करण्याच्या सूचना आशा वर्करर्स, एएनएम ,जीएनएम यांना देण्यात आल्या. या सर्वेक्षणामध्ये मागील ३ महिन्यात अंगावर पुरळ आणि ताप अशी लक्षणे असलेले रुग्ण शोधून काढणे व त्यांची नोंद ठेवणे. त्यांचा मागील काळात झालेला विविध ठिकाणचा प्रवास यासर्वाबद्दल माहिती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### छ. शिवाजी महाराजांबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्या

## राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांचा मुरुड शिवसेनेच्या वतीने जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना मुरूड तालुका प्रमुख नौशाद दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्या राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांचा मुरुड बाजारपेठेत चप्पल मारुन जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी उपतालुकाप्रमुख अशिल ठाकुर, उपतालुकाप्रमुख चिंतामणी बेडेकर, पंचायत उप सभापती चंद्रकांत मोहिते, तालुका संघटक कुणाल सतविडकर युवासेना, शहर प्रमुख आदेश दांडेकर, विधानसभा अधिकारी - रुपेश रोटकर, युवासेना तालुका अधिकारी - विक्रांत कुबल, विभाग प्रमुख नरेश कुबल, उपशहरप्रमुख प्रशांत कासेकर, उपशहरप्रमुख विजय वाणी, युवासेना शहर अधिकारी- प्रतीक उमरोटकर, युवासेना उपशहर अधिकारई यश माळी, महिला आघाडी संघटिका राजश्री मिसाळ, शहर संघटक राहुल कासार, जेष्ठ शिवसैनिक प्रमोद भायदे, माजी नगराध्यक्षा बाळकृष्ण गोंजी, मुग्धा जोशी, दिपाली जामकर, उत्कर्षा धोत्रे, योगेश सुर्वे, मोहन पाटील, रुपेश जामकर, सुनील शेळके यांसह पदाधिकारी, युवा सैनिक, शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




मा.श्री.डी.एम.वाघमारे साहेब यांचे न्यायालय

अर्जदाराचे वकील : सुधीर स. मेढेकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील क.स्तर दिवाणी न्यायालय, यांचे न्यायालय, पनवेल, जि.रायगड
दि.चौ.अर्ज क्र.१००१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२२

१) श्री.राजकुमार श्रीकांत केवट
वय वर्षे ४३, व्यवसाय : नोकरी
२) श्री.मनोजकुमार श्रीकांत केवट
वय वर्षे ४१, व्यवसाय : चिकित्सक
३) श्री.सुनीलकुमार श्रीकांत केवट
वय वर्षे ३८, व्यवसाय : नोकरी
४) श्री.अनिलकुमार श्रीकांत केवट
वय वर्षे ३४, व्यवसाय : नोकरी
५) कुमारी बबिता श्रीकांत केवट
उर्फ सौ.बबिता विजय निषद
वय वर्षे ३०, व्यवसाय : गृहिणी
६) श्रीमती.अकलादेवी श्रीकांत केवट
वय वर्षे ६१, व्यवसाय : गृहिणी
सर्व रा.सदनिका क्र.१०१, रिद्धी सिद्धी आकृती
प्लॉट क्र.६३, सेक्टर-३४, कामोठे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येत आहे की, कै.श्रीकांत प्रसाद केवट हे दि.२७/०४/२०१९ रोजी रिद्धी सिद्धी आकृती, प्लॉट क्र.६३, सेक्टर-३४, मौजे : कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. वरील अर्जदार यांनी कै.श्रीकांत प्रसाद केवट, यांच्या खालील नमूद मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकामी या माननीय मे.क.स्तर दिवाणी न्यायालय, पनवेल, जिल्हा : रायगड यांच्याकडे अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.१०२, पहिला मजला, रिद्धी सिद्धी आकृती, प्लॉट क्र.६३, सेक्टर-३४, मौजे : कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०९, क्षेत्र ३६.३२ चौ.मी. / बांधीव क्षेत्र + टेरेस १३.२१८ चौ.मी. क्षेत्र**

तरी सदरचे अर्जदार हे कै.श्रीकांत प्रसाद केवट यांचे कायदेशीर वारस आहेत. या त्यांच्या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकत / हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मा.न्यायालयात आपली हरकत / हरकती दाखल करावी.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे सदर कामी वारसाचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.१६/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**


## राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचा म्हसळा शिवसेनेतर्फे जाहीर निषेध



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी छ. शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याने राज्याचे राजकारण चांगलेच तापले असून राज्यात विविध ठिकाणी आंदोलने करीत राज्यपाल कोश्यारी यांचा जाहीर निषेध नोंदवीला जात आहे.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यपालांवर टिकेची झोड उठविली असून म्हसळ्यामध्येही शिवसेना, महिला आघाडी, युवासेना यांच्या तर्फे राज्यपाल कोश्यारी यांचा जाहीर निषेध करून त्यांना ताबडतोब पदावरून हटविण्याची मागणी करण्यात आली असून तसें निवेदन निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे आणि पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे यांच्याकडे देण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख सुरेश कुडेकर, माजी तालुका प्रमुख रविंद्र लाड, नगरसेवक मुन्ना पानसरे, कौस्तुभ करडे, अमित महामूनकर, हेमंत नाक्ती, राहुल जैन, श्रीम. महामूनकर, दीपल शिर्के, विशाल सायकर, अनिल महामूनकर, बाळा मेंदाडकर आदि मान्यवर उपस्थित होते.


मा.खिरापते साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.अनिल एस. जाधव

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२१९/२०२२
नि.नं.९/ड
ने.ता.०३/०१/२०२३

१) मोहम्मद आबिद मोहम्मद हुसैन बक्षी
वय : ८३ वर्षे, धंदा : काही नाही
२) श्री.मोतसीम आबीद बक्षी
वय : ५२ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.सना नबील रोघे
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रोघे हाऊस, पहिला माळा,
८ नागादेवी स्ट्रीट नाखुडा मोहल्ला,
मोहम्म अली रोड, मुंबई ४००००३
४) सौ.सिनिन मुईन हैदांडे
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.हैदांडे हाऊस, दुसरा माळा, अली उमर स्ट्रीट,
नल बाजार मुंबई ४००००३
अर्जदार क्रं.१ व २ रा.उरण, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, पै.नुझहत आबिद बक्षी ही उरण येथे दि.१०/०५/२०२२ रोजी मयत झालेली आहे. तीच्या सामाईक मालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथील वडिलोपार्जित सिडकोने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|
| २९६ | १/ए | ०२-४२-०० | १९ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मयत पै.नुझहत आबिद बक्षी त्यांच्या सामाईक मालकीची होती व आहे यांच्या संपादीत मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता सिडको महामंडळाकडून नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झालेल्या मिळकतीचे १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड प्राप्त करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने योग्य व उचित असल्याने अर्जदार यांनी मयताचा वरसदाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर उरण यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील संपादीत मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलांमार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे. व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज माहे २१ नोव्हेंबर सन २०२२ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**


# द.रा. देशमुख वाचनालय तळा पुनर्जीवीत करणार : संजय बोंदार्डे

**दै.रायगड नगरी । तळा**

द.रा.देशमुख वाचनालय तळा येथे सन१९९२ पासून सुरू करण्यात आले होते. भावी पिढीला वाचन संस्कृती वाढीस लागावी या उदात्त हेतूने किरण शेट देशमुख यांनी पिताजीच्या नावाने स्थापना केली परंतू गेले काही वर्ष हे वाचन मंदिर शासनाच्या निकषामुळे त्याचे मान्यता काढून घेण्यात आली होती. परंतु महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे तरुण पिढींमध्ये वाचनाची जनजागृती व्हावी व बौद्धिक क्षमतावाढावी या उद्देशाने रायगड जिल्ह्यातील बंद पडलेली वाचनालय ही पुन्हा त्या वाचनालयाला उभारी देऊन सर्वांसाठी खुलं व्हावं यासाठी रायगड जिल्हा ग्रंथालय अध्यक्ष संजय कोपर्डे यांनी आज तळा येथे घेतलेल्या सभेमध्ये आज याला तो तत्वतः मान्यता देऊन अत्याधुनिक पद्धतीचे सर्वांना मध्यवर्ती ठिकाणी साहित्य, ऐतिहासिक लेख, दैनिक, वाचायला मिळतील व विद्यार्थी तरुण पिढी व ज्येष्ठ नागरिक यांना एकाच ठिकाणी सगळे वाचता येईल.

या दृष्टिकोनातून चालू करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत या सभेला म्हसळा वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे श्रीवर्धन चे गोगटे रोहा येथील रवींद्र तावडे उपस्थीत होते या सभेचे अध्यक्षस्थानी संजय कोपर्डे यांनी स्वीकारले यावेळी वाचनालयाचे संस्थापक किरण देशमुख अध्यक्ष डॉ. सतीश वडके उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, महेंद्र कजबजे मुंतुंगे सर डॉ. विभावरी देशमुख ऋता देशमुख हृदयरेडीज अश्वीनी कानिटकर वगैरे मान्यवर उपस्थित होते यावेळी वाचकांनी मनोगतात वाचनालयाची नितांत गरज असून तरूण पिढी वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचनाने जनरल नॉलेज वाढण्यास मदत होते.

त्याबरोबर धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक, साहित्यिक माहिती, इतिहासाची माहिती होते. यामुळे भावी पिढीचा मोबाईल वापर कमी होण्यास मदत होईल असे मत व्यक्त केले. यावेळी ग्रंथपाल मनोज वाढवळ नितेश मुळे यांच्या विशेष मार्गदर्शनानंतर सहकार्य करण्याचे मान्य केले असून लागेल ती मदत केली जाईल असे आश्वासन नगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी दिले आभार प्रदर्शन मुतुंगे सर यांनी केले.


मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.गजानन पी. लासुरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३२१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२२

१) श्रीमती.मंगल जगदीश घोडेराव
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.विशाखा जगदीश घोडेराव
वय : २३ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.प्राची जगदीश घोडेराव
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.अमेय जगदीश घोडेराव
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.महालक्ष्मी हौसिंग सोसायटी, ए-१२,
रुम नं.१२, घरकूल, डी मार्ट जवळ, सेक्टर-१५,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्रं.२ ते ४ यांचे वडील कै.जगदीश सोनाजी घोडेराव हे दि.२३/०४/२०२१ रोजी कोविड सेंटर बांद्रा ईस्ट मंबई येथे मयत आहेत. तसेच त्यांची खारघर, पनवेल, अहमदनगर, बिड, मुंबई येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली मिळकती आहेत. त्यांचे खालीलप्रमाणे वर्णन

**मिळकत क्रं.१**

**मौजे : तक्का, ता.पनवेल, जि.रायगड**

**मोराज केएल-टाइप को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**

| मौजे | फ्लॅट नं. | क्षेत्र | मजला | विंग |
|---|---|---|---|---|
| तक्का | ४०३ | २४१ चौ.फूट कारपेट | चौथा मजला | K-3 |

**मिळकत क्रं.२**

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

**घरकूल महालक्ष्मी को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**

| मौजे | फ्लॅट नं. | क्षेत्र | मजला | विंग |
|---|---|---|---|---|
| खारघर | A-12/2:12 | २७.०९+९.७ चौ.मी. कारपेट | दुसरा मजला | A-12 |

**मिळकत क्रं.३**

**सातबारा मौजे : चिखली, ता.गेवराई, जि.बिड येथील शेतजमीन मिळकत**

| मौजे | सर्व्हे क्र./गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| चिखली | १३० | - | २-६१-०० पैकी ०-८०-०० |

**मिळकत क्रं.४**

**सातबारा मौजे : चिखली, ता.गेवराई, जि.बिड येथील शेतजमीन मिळकत**

| मौजे | सर्व्हे क्र./गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| चिखली | १३० | - | २-६१-०० पैकी ०-८१-०० |

**मिळकत क्रं.५**

**मौजे : येळी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर येथील घर मिळकत**

| मौजे | घर अनुक्रमांक | गट क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| येळी | १७६ | ७५९ | ३ गुंठे खुली जागा |

कै.जगदीश सोनाजी घोडेराव यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात पॅरा नं.२ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.जगदीश सोनाजी घोडेराव यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.जगदीश सोनाजी घोडेराव यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२१/११/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मोरा हायस्कूल येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था न्यू इंग्लिश स्कूल मोरा उरण येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतील विजेते विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

१७ वर्षा खालील जिल्हास्तरावर निवड झालेले विद्यार्थी कु. तनवी पारकर गोळा फेक प्रथम व थालीफेक द्वितीय कु. कविता चव्हाण १५०० मीटर धावणे प्रथम व ३००० मीटर धावणे द्वितीय,कु. वैष्णवी देवरुखकर १०० मीटर धावणे द्वितीय व २०० मीटर धावणे तृतीय,खो खो मुली गट तृतीय क्रमांक शिवकुमार वाल्मिकी ३००० मीटर धावणे तृतीय व १४ वर्षाखालील जिल्हास्तरावर निवड झालेले विद्यार्थी गौरेश धुले १०० मीटर धावणे प्रथम क्रमांक खो खो मुले गट प्रथम क्रमांक कबड्डी मुली गट द्वितीय क्रमांक कु. कस्तुरी गवस थालीफेक तृतीय व ६०० मीटर धावणे तृतीय,तर कु. दीक्षा साबळे लांब उडी तृतीय क्रमांक या सर्व विजेत्या खेळाडू विद्यार्थी, विद्यार्थिनी शाळेच्या वतीने कौतुक करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समिती चेअरमन परशुराम कोळी व चंद्रकांत कोळी, शाळा समिती सदस्य आर. के. पाटील, राजश्री कोळी, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर, साईनाथ गावंड, संध्या ठाकूर, मंगला शिंदे, रोहिणी घरत, सुप्रिया मुंबईकर, सुनीता पाटील, राणी कदम, सुगेंद्र म्हात्रे, रूपाली चौधरी, रेश्मा कोल्हे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अपशब्द ; राष्ट्रवादीने केला कळंबोलीत निषेध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथे युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अपशब्द वापरणाऱ्या भाज्यपाल भगतसिंग विषारी यांच्या विरोधात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला दुग्धभिषेक पुष्पहार अर्पण करून निषेध आंदोलन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी वारंवार विषारी अपशब्द वापरत आहेत तरी विषारी यांच्या विरोधात त्यांच्या या महाराष्ट्र विरोधी व शिवद्रोही मानसिकतेचा निषेध आंदोलन करण्यात आले.



जिल्ह्याचे अध्यक्ष सतीश पाटील, प्रदेश सरचिटणीस सुदाम शेठ पाटील, महिला प्रदेश सरचिटणीस आमच्या नेत्या भावना ताई घाणेकर, युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद बागल, कार्याध्यक्ष शहबाज पटेल, खारघर शहराध्यक्ष बळीराम नेटके, जिल्हा सरचिटणीस संजय नानवरे, महिला अध्यक्ष राजश्री ताई कदम, कामोठे शहर महिला अध्यक्ष संगीताताई पवार, प्रतिमा ताई जाधव, व्हिजेएनटी अध्यक्ष आनंद भंडारी, युवक जिल्हा उपाध्यक्ष किशोर साळुंखे, संजय पुजारी, राजू नलावडे, जिल्हा सरचिटणीस हुसेन पटेल, सचिव चांद भाई शेख, विलास खरटमोल, अक्षय पाटील, खारघर शहर सरचिटणीस मनीष कुळे, व सर्व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते, महिला भगिनी यावेळी उपस्थित होत्या.

# वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या स्पा वर पोलिसांची धाड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्पा व मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवल्या जाणाऱ्या खारघर सेक्टर–८ मधील गौतमी ब्लीस स्पावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापा मारुन स्पा मालक व मॅनेजर या दोन महिलांवर पिटा अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांन ताब्यात घेतले आहे. त्याचप्रमाणे सदर स्पामध्ये मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसायासाठी ठेवण्यात आलेल्या ४ महिलांना देखील पोलिसांनी ताब्यात घेण्याची कारवाई केली.

खारघर सेक्टर– ८ मधील भूमी हाईट्स इमारतीतील गौतमी ब्लीस स्पामध्ये बॉडी मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवण्यात येत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने गौतमी ब्लीस स्पामध्ये एक बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केली. या वेळी सदर स्पामध्ये वेश्याव्यवसाय चालवण्यात येत असल्याची खात्री पटल्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सदर स्पावर छापा मारला. या वेळी सदर स्पामध्ये बॉडी मसाजसाठी ठेवण्यात आलेल्या चार महिलांकडून बॉडी मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करून घेण्यात येत असल्याचे आढळून आले. या प्रकरणी स्पाची मालकीण स्मिता शिवदास व व्यवस्थापक शेरॉन बदली या दोघींविरोधात खारघर पोलीस ठाण्यात पीटा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे.

# महिलेला लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मध्ये राहणाऱ्या लहान बहिणीला भेटण्यासाठी आलेल्या एका महिलेच्या गळ्यातील २५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र दोघा लुटारूंनी खेचुन मोटारसायकलवरुन पलायन केल्याची घटना खारघर सेक्टर– ३ मध्ये घडली. प्रमीला जाधव (४६) हि महिला मुंबईत फोर्ट भागात राहण्यास असून तिची लहान बहिण खारघर सेक्टर– ३ भागात राहण्यास आहे. प्रमीला आपल्या लहान बहिणीला भेटण्यासाठी खारघर येथे आली होती. दरम्यान प्रमीला पायी चालत सेक्टर– ३ मधील बेलपाडा येथील शिवदर्शन बिल्डींगसमोरून जात असताना मोटारसायकलवरून आलेल्या दोघा लुटारुपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारुने प्रमीला जाधव हिच्या गळ्यातील २५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र खेचले. त्यानंतर त्याने आपल्या मित्रासह मोटारसायकलवर बसुन स्टेशनच्या दिशेने पलायन केले.

# जागतिक शौचालय दिनानिमित्ताने महापालिकेची उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक शौचालय दिनानिमित्त विविध उपक्रमांच्या माध्यमातून शहरातील सर्व नागरिकांना खासगी, सामुदायिक शौचालयाचा वापर करण्याचे जाहिर आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले.

१९ नोव्हेंबर हा जागतिक शौचालय दिवस म्हणून साजरा केला जातो. नागरिकांमध्ये शौचालय वापरण्याची सवय व्हावी यासाठी महापलिकेच्यावतीने प्रभाग समिती 'ब'कळंबोली, नवीन पनवेल सेक्टर ३,प्रभाग समिती 'अ' खारघर प्रभाग ४ रिलायन्स फ्रेश शॉप् ,रघूनाथ विहार, सेंट्रल पार्क,पनवेल प्रभाग 'ड'मध्ये प्रभाग समिती 'ड'च्या कार्यालयासमोर,आदई सर्कल,रोडपाली स्मशान भूमी याठिकाणी आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार दिनांक १९ नोव्हेंबरला जनजागृती मोहिम घेण्यात आली.

उपायुक्त सचिन पवार आणि सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व आरोग्य विभागाच्यावतीने विविध ठिकाणी रांगोळ्या,पोस्टर्स,बॅनर्स लावून जनजागृती करण्यात आली. तसेच नागरिकांना प्रबोधनात्मक मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी प्रभाग 'अ' चे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी तथा मुख्य आरोग्य निरीक्षक ,मलनिस्सारण विभागाचे अधिक्षक भावेश चंदने, इन्फिनीटी फाऊंडेशनचे आयुफ आकुला, विविध प्रभागातील आरोग्य निरीक्षक स्वच्छता निरीक्षक, मुकादम, स्वच्छता दूत तसेच मोठ्या नागरिक उपस्थित होते.



# शिवाजी महाराजांबद्दल अनुद्गार काढणाऱ्या राज्यपाल कोश्यारींचा श्रीवर्धनमध्ये निषेध

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

छत्रपती श्री शिवाजी महाराजांबद्दल नुकतेच अवमानकारक उद्गार काढलेल्या राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचेबद्दल संतापाची लाट सर्वत्र उसळली असून ठिकठिकाणी त्यांच्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत असून निषेध मोर्चेही काढले जात आहेत.



श्रीवर्धनमध्ये सोमवार दि.२१ रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिव–सेनेतर्फे एक निषेध मोर्चा काढण्यात आला होता. हा मोर्चा श्रीवर्धन नगर परिषदेपासून निघून छ.शिवाजी चौकापर्यंत आला. मोर्चामध्ये आणि चौकामध्ये–ही कोश्यारींच्या निषेधाच्या घोषणा देण्यात येत होत्या. शिवाजी चौकामध्ये मोर्चे कऱ्यांनी संतापाने अनावर होऊन कोश्यारी यांच्या प्रतिमेला जोडे मारले. तद्नंतर शिव–सेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख अविनाश कोळंबेकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. ते म्हणाले की, छ.शिवाजी महाराजांबद्दल अनुद्गार कदापि सहन केले जाणार नाहीत.राज्यपाल कोश्यारी यांनी छत्रपतींबद्दल जे अवमानकारक उद्गार काढले त्याबद्दल आम्ही सर्वजण त्यांचा तीव्र शब्दात निषेध करीत आहोत.मोर्चामध्ये शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख अविनाश कोळंबेकर,उप तालुका प्रमुख सचिन गुरव,संघटक अरुण शिगवण,शहर प्रमुख राजेश चव्हाण महिला अध्यक्षा रुची बोरकर,बोर्ली विभाग प्रमुख रमेश कांबळे,युवा सेना अधिकारी धवल तवसाळकर, शहर युवा सेना अधिकारी चाफेकर व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मोर्चाबरोबर पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली चोख पो–लीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

# अनाथ मुलांसाठी कर्नाळा सहल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ, पनवेल यांच्या वतीने कमल अर्णव चॅरिटेबल ट्रस्टच्या अनाथ बालकांसाठी कर्नाळा अभयारण्याच्या सहलीचे आयोजन करण्यात आले. कर्नाळा अभयारण्यात पोहचल्यावर सर्व मुलांचे स्वागत फुलांनी करण्यात आले. त्यानंतर मुलांनी विविध मनोरंजनात्मक खेळांचा आनंद घेतला. वैभवी मराळ यानी त्याचे उत्तम नियोजन केले. त्यानंतर पक्षीदर्शन करून व बागेत मनसोक्त खेळून मुलांनी सहलीचा आनंद घेतला. यावेळी मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या. संघाच्या उपाध्यक्ष प्रिया खोबरेकर, प्रिता भोजने, धनश्री धुरी, विजया सावंत, विद्या इंदप, सीमा मेस्त्री, सुरेखा पवार, अर्चना तावडे या महिला कार्यकर्त्यांसोबत अध्यक्ष केशव राणे, उपाध्यक्ष संतोष चव्हाण, सचिव बाप्पा मोचेमाडकर, प्रदीप रावले, बाबाजी नेरूरकर, अशोक चव्हाण यांनी या सहलीसाठी मोलाचे योगदान दिले.

# वशेणी येथे सामाजिक कार्यकर्त्यांचे रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

रक्तदान सर्वश्रेष्ठ ज्ञान म्हणून समजले जाते. समाजात रक्ताचा तूटवडा लक्षात घेता रक्ताच्या अभावी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यु होउ नये. तसेच गरिब, गरजू व्यक्तीला वेळेत रक्त उपलब्ध या दृष्टीकोनातून उरण तालुक्यातील वशेणी गावातील सामाजिक कार्यकर्त्यांनी येत एकत्र श्री हनुमान मंदिर वशेणी येथे रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबीराला या परिसरातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

वशेणी गावातील तरुण सामाजिक कार्यकर्ते विक्षेप पाटील, सनी म्हात्रे,बंधन म्हात्रे, परिक्षित शिंदे, निखिल म्हात्रे,निशांत ठाकूर, सुशांत म्हात्रे, प्रितेश गोंधळी, सुरज म्हात्रे, मनिष ठाकूर, आकाश पाटील, अल्पेश म्हात्रे , शुभम पाटील, निखिल ठाकर, सुबोध पाटील आदी तरुण, यंग वयातील सामाजिक कार्यकर्त्यांनी या रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. एकूण ३० रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरास जिल्हा शासकीय रुग्णालय अलिबाग यांचे विशेष सहकार्य लाभले. डॉ. दिपक गोसावी यांच्या संपूर्ण टीमने उत्तम नियोजन करून रक्त संकलन केले. या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून विविध सामाजिक कार्यात नवीन पिढीने, तरुण पिढीने हिरीरीने सहभाग घ्यावा.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक यांच्याकडून कायमस्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : लोणिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १९४ | १३ | ०–१४–०० पो.ख. ०–०१–०० एकूण ०–१५–०० | ०.३१ | श्री.मयुर रसिकलाल सत्रा. |
| १९४ | १८ | ०–१६–०० | ०.१८ | श्री.गिरीश विसनजी देठीया. |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
तारीख: १९/११/२०२२

सही/–
**ॲड.एस.के.राणे**
**ऑफिस नं.१२३, पहिला मजला, म्युन्सिपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट, जवळ, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८१९८६९२१२**



मे.सोनवलकर साहेब

प्रो.जमा रु.५०/– अर्जदारतर्फे वकील
सौ.रश्मी बळीराम जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज नं.१३१५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/१२/२०२२

श्री.निकेत नरेश ठाकूर
वय : वर्षे, धंदा : नोकरी
रा.सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपचांयत, पालीदेवद (सुकापूर),
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांचा भाचा कु.शौर्य कुंदन पाटील याचा दि.०८/०५/२०१० रोजी मौजे : सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला आहे. सदर जन्माची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेलेले आहे. कारण त्याचा जन्म मौजे : सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. सबब अर्जदार भाचा कु.शौर्य कुंदन पाटील याचा जन्माची नोंद केलेली नाही. सबब अर्जदार यांचा भाचा कु.शौर्य कुंदन पाटील याचा दि.०८/०५/२०१० रोजी झालेला आहे. जन्म मृत्यू नोंदणी कायदा अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबत संबंधित ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद (सुकापूर), ता.पनवेल, जि.रायगड यांना योग्य ते आदेश देणेबाबत नामदार कोर्टाने अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म नोंदीचा आदेश देण्यासंबंधी कोणाही कोणाच्याही कसल्याही इसमाच्या कोणत्याही हरकती आल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस त्यांच्या जन्माची नोंदीचा आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत श्री.सय्यद जाकीर अली, श्री.सय्यद इस्माईल अली, रा.मुंबई यांचेकडून आमचे अशिल १) श्री.भास्कर दशरथ पाटील, रा.रोहिंजण, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड, २) श्री.नितीन पंढरीनाथ कोपरकर, रा.पेंधर, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड कायम खरेदीखताने विकत घेणार आहेत.

**मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :–**

| मौजे | गट व उपविभाग क्र. | भोगवटादार वर्ग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| निताळे | ९६/५ | १ | ०–१०–९० पो.ख. ०–०२–५० एकूण ०–१३–४० | १.८१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लीज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्तदावा, वारसाहक्क, लायसन्सी, लीन, टेनन्सी, वील, अन्नवस्त्र, पोटगी, ताबेकब्जा, हवाला, अदलाबदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत लेखी पुराव्यासह पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कुणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मागाहून कोणत्याही स्वरुपाची हरकत घेतल्यास ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल
तारीख : २१/११/२०२२

सही/–
**ॲड.योगेश एन. केळकर**
**रा.६१९, बापटवाडा, टिळक रोड, रतन टॉकीज जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९३२२८२७४०६**



मे.पांडे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
सौ.रश्मी बळीराम जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
क्रि.चौ.अर्ज नं.१३११/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२१/१२/२०२२

श्री.गणपत चंदर पाटील
वय : वर्षे, व्यवसाय : शेती
मु.सिद्धी करवले, पो.तळोजा,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग समिती–अ, नावडे
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असल्यामुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.गणपत चंदर पाटील यांची आई स्व.कमलाबाई चंदर पाटील हे दि.०९/०५/१९६१ रोजी मयत असल्या कारणाने अर्जदारांच्या आईची मृत्यूची नोंद करून मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. स्व.हशीबाई आंबो जोशी रा.मु. सिद्धी करवले, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला असल्याने अर्जदाराने या न्यायालयात स्व.कमलाबाई चंदर पाटील यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहून स्व.कमलाबाई चंदर पाटील ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्य हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहून न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२१/११/२०२२ रोजी दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**



मा.गोडसे साहेब

ॲड.सुधीर म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६३५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/१२/२०२२

१) श्रीमती.प्रियांकाकुमारी
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.पो.प्लॅटीनम इस्कासो, फ्लॅट नं.ए/६०४,
प्लॉट नं.८६, सेक्टर नं.२१, उलवे,
वहाळ, नवी मुंबई ४१०२०६
२) कु.अर्णवकुमार
वय : ०८ वर्षे, शिक्षण
मुळ र.आत्मजःगौतम कुमार,
सुमन पॅलेस, बी/३०६, ईस्ट इंदिरा नगर,
लोहिया नगर, जगनपुरा मोड के पास,
कुकडबाग, पटना बिहार ८०००२०
सध्या रा.मु.पो.प्लॅटीनम इस्कासो,
फ्लॅट नं.ए/६०४, प्लॉट नं.८६,
सेक्टर नं.२१, उलवे, वहाळ, नवी मुंबई ४१०२०६
३) कु.अकर्शकुमार
वय : ०४ वर्षे, शिक्षण
रा.मु.पो.प्रोग्रेसिव मीरा आंगण, फ्लॅट नं.९०२,
प्लॉट नं.१५२, सेक्टर ०२,
उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
(अर्जदार नं.२ व ३ ची अज्ञान पालनकर्ता म्हणून
अर्जदार नं.१ सही करणार) अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै.श्री.गौतम कुमार हे दि.२० नोव्हेंबर २०२१ रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल, वाशी नवी मुंबई येथे मयत झाले. वरील अर्जदार हे मयत ह्यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.श्री.गौतम कुमार यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यांस वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२१/११/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**